# डॉ. दीपक शिकारपूर

**परिचय**- डॉ. दीपक शिकारपूर म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व! माहिती- तंत्रज्ञान, संगणक उद्योगातील अग्रणी, जागतिक कीर्तिचे तंत्रउद्योजक, समुपदेशक, प्रभावी लेखक आणि वक्तेही! डॉ. दीपक हे माहिती, तंत्रज्ञानविषयक जागतिक पातळीवरचे दर्जेदार शिक्षण भारतीय जनतेला उपलब्ध व्हावे यासाठी गेले अनेक वर्षे प्रयत्नशील असून संगणक साक्षरता, उद्योजकतेचे व योग्य व्यावसायिक शिक्षणाचे आग्रही पुरस्कर्तेही आहेत.

**शैक्षणिक पार्श्वभूमी** - एक अष्टपैलू विद्यार्थी, सांगलीच्या वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी १९८५ मध्ये त्यांनी विशेष प्राविण्य व विद्यापीठात ६वा कमांक. १९८८ मध्ये आय.एम.डी.आर. मधून बिझीनेस मॅनेजमेंटचा डिप्लोमा तसेच मास्टर्स डिप्लोमा विशेष प्राविण्यासह. २००८ मध्ये माहिती, तंत्रज्ञान आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट या विषयावर संशोधन करून अमेरिकेतील यंगस्फील्ड विद्यापीठात पी.एचडी चा बहुमान मिळवला. २०१० मध्ये भारती विद्यापीठातून इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजीमध्ये डॉक्टरेट संपादन केली. १५ वर्षे टाटा समूहात काम केल्यावर डॉ. शिकारपूर स्वतंत्र तंत्रउद्योजक म्हणून ते कार्यरत आहेत.

**व्यवसाय तज्ञ** –

- ऑटोलाईन डिझाईन सॉफ्ट वेअर, सीड इन्फोटेक, प्युअर आय.टी., फडणीस इन्फ्रास्ट्रक्चर इ. कंपन्यांचे ते संचालक आहेत.
- सभासद, ग्लोबल अॅडवायजरी बोर्ड, सामा टेक्नॉलॉजी, अमेरिका, क्लालिटी अॅशुअरन्स संस्था, अमेरिका

**भूषवलेली विविध पदे**

- माजी अध्यक्ष –कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया, पुणे
- मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या आय.टी.सब कमिटीचे अध्यक्ष
- पुणे विद्यापीठात कॉम्प्युटर मॅनेजमेंटच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक
- तंत्रशिक्षण मंडळ – सुधार समिती, महाराष्ट्र राज्य, नियामक मंडळाचे सभासद
- विश्वस्त – भारतीय विद्याभवन, पुणे केंद्र

**कार्य** - डॉ. शिकारपूरांचे स्वप्न म्हणजे आय.टी.-इंडियाज टॅलेन्ट- भारताला सन २०२५ पर्यंत एक विकसित राष्ट्र बनवेल. आपल्या ध्येयाचा पाठपुरावा त्यांनी डिजीटल युगाच्या माहितीच्या जनजागृतीने, समाजप्रबोधनाने केला. या ‘आय.टी. गुरू’ने डिजीटल सहस्त्रक, सायबर कायदे, इंटरनेट, मोबाईल,

ईआरपी (एंटरप्राईज रिर्सोस प्लॅनिंग) सारख्या अनेक नवनवीन क्षेत्रांची ओळख करून दिली. सर्व स्तरांमध्ये सामाजिक प्रबोधन आपल्या लेखांमधून व व्याख्यानातून करतात. तसेच विद्यार्थ्यांना आणि उद्योजकांना समुपदेशनही करतात.

त्यांनी संगणकाविषयी विविध विषयांवर १६ पुस्तके ओघवत्या माहितीप्रचुर पण सोप्या भाषेत लिहीली आहेत. या लोकप्रिय पुस्तकांच्या सरासरी ३ आवृत्ती विकल्या गेल्या आहेत. यातून आलेल्या रकमेचा विनियोग ते उपेक्षित वर्गाच्या माहिती, तंत्रज्ञान शिक्षणासाठी करतात.

**गौरव व पुरस्कार** – कॉसमॉस पुरस्कार २०००, कै. शंतनुराव किर्लोस्करस्मृती पुरस्कार –महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवात उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान. १ मे २००१

सन्माननीय सदस्य (फेलो) इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स, महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ सायन्स

वीर सावरकर पुरस्कार २००६, रँग्लर परांजपे पुरस्कार (२००७)

मा. मुख्यमंत्र्यांनी स्थापलेल्या आय.टी. गटाचे सभासद

नागपूर विद्यापीठाच्या कौशल्यपीठाची कोनशिला डॉ. शिकारपूरांच्या हस्ते बसवली गेली. (२०११)

एज्युकॉन या कुलगुरुंच्या विचार परिषदेचे ते अतिथी वक्ते असून अतिथी वक्ते म्हणून थायलंड, मलेशिया तसेच श्रीलंका येथे निमंत्रण.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे तंत्रज्ञान व शास्त्र लोकप्रिय करणाऱ्या लेखकांना दिला जाणारा कै. गो.रा. परांजपे पुरस्कार २०११.

**उल्लेखनीय–** डॉ. दीपक शिकारपूरांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचा मागोवा घेतला तर खेळ, कलात्मकता यांची व्यावसायिकतेशी योग्य सांगड घातलेली प्रकर्षाने जाणवते. सिनेमा, वाचन आणि मित्र जोडणे हे त्यांचे छंद आहेत. त्यांची पत्नी रोटेरियन गौरी ह्या शास्त्रीय संगीताच्या शिक्षिका असून पॉल हॅरिस सोसायटीच्या सन्मान्य सदस्या आहेत. त्यांचा मुलगा वेदव्रत, आय.टी. तील पदवी शिक्षण घेत आहे.

**रोटेरियन डॉ. दीपक**

- डॉ. शिकारपूर शिवाजीनगर रोटरी क्लब ऑफ शिवाजीनगरचे सन १९९१ पासून क्रियाशील सभासद
- त्यांचे कार्यक्षेत्र माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार हेच आहे.
- २००५–०६ मध्ये क्लबचे ते अध्यक्ष होते आणि त्यांना सर्वोत्कृष्ट अध्यक्ष म्हणून गौरविण्यात आले

- सप्टेंबर २००९ मध्ये त्यांना रोटरी इंटरनॅशनल्सच्या ४ अॅव्हेन्यू सायटेशनने गौरविण्यात आले.
- रोटरी फौंडेशनचे सेकंड लेव्हल मेजर डोनर म्हणून गौरविण्यात आले.
- डॉ. दीपकनी रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३० व ३१३१ मध्ये विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आणि कामगिऱ्या यशस्वी केल्या. त्यांनी भूषवलेली अनेक पदे –चेअरमन कॉर्पोरेट प्रमोशन (रोटरी फौंडेशऩ) असिस्टंट गव्हर्नर, जीएसई टीम लीडर (डिस्ट्रीक्ट ६६००, ओहायोला भेट), डायरेक्टर (रोटरी यूथ व फॅमिली), डायरेक्टर (रोटरी फौंडेशन प्रमोशन) आणि डिस्ट्रीक्ट सेकेटरी ( इव्हेंटस् अँड मीटस्)
- **२०१३–१४ साठी त्यांची जिल्हा प्रांतपाल (डिस्ट्रीक्ट गर्व्हनर) म्हणून बिनविरोध निवड झाली आहे**. प्रांत ३१३१ मध्ये पुणे, रायगड, पनवेल व कोकण प्रभाग समाविष्ट आहे.